# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**
**क्र.रामाआ नाशिक/तक्रार क्र.२५९/२०२५/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.रघुनाथ पर्वत कुवर,<br>रा.सं.नं.६७/१, सप्तश्रृंगी रेसिडन्सी, चर्चमागे, लखन डेअरीसमोर, मालेगांव कॅम्प ता.मालेगांव, जि.नाशिक ४२३१०५. | तलाठी,<br>तलाठी यांचे कार्यालय, अजंग.<br>ता.मालेगांव, जि.नाशिक. |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

## विवेचन

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रार क्र.२५९/२०२५/नाशिक संदर्भात दि.१६/०७/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीत आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग श्री.ए.डब्लु.साने यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. आयोगाच्या उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग ता.मालेगांव, जि.नाशिक श्री.अमित विल्सन साने यांनी आयोगाकडे दि.२०/०१/२०२६ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अर्जदार श्री.रघुनाथ पर्वत कुवर यांनी त्यांच्या दि.१८/१०/२०२१ रोजीच्या मुळ माहिती अधिकार अर्जात मागितलेली माहिती १)मौजे अजंग येथील गा.नं.नं.१५ ची साक्षांकित प्रत (दि.३०/०४/२००९ ते दि.३१/०३/२०१० पावेतो) २) दि.१३/१०/२०२१ रोजी सौ.ललिता रघुनाथ कुवर यांनी दिलेल्या अर्जाबाबत झालेला कार्यवाहीचा तपशिल व दि.१३/०९/२०२१ च्या आवक जावक गा.न.नं.१५ साक्षांकित नक्कल ही अर्जदार यांना रजिस्टर टपालाने विनामूल्य पाठविली आहे. याबबतची रजिस्टर पोस्टाची व पाठविलेल्या माहितीची साक्षांकित प्रत अवलोकनार्थ सोबत जोडून सविनय सादर करण्यात येत आहे. तसेच आपणांकडील द्वितीय अपिल क्र.१३६३/२०२२/नाशिक दि.१५/०४/२०२५ अन्वये पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी मी आजारी असल्याने अनावधनाने माझ्याकडून उशिराने झाली याबाबत मे.न्यायालयाची माफी मागतो व भविष्यात माझ्याकडून अशी चुकी होणार नाही अशी ग्वाही देतो. माहिती न पुरविणे किंवा आपल्या आदेशाचा अवमान करणे हा माझा हेतू नव्हता तसे माझ्याकडून अनावधनाने घडले असल्याने त्याबद्दल आयोगाची विनंतीपूर्वक माफी मागत आहे. माझ्या खुलाशाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन माझ्याविरुध्द शास्ती करु नये ही नम्र विनंती.

३. आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, आयोगाने द्वितीय अपिल क्र.१३६३/२०२२/नाशिक संदर्भात दि.१०/०७/२०२४ रोजी झालेल्या सुनावणीचे आदेश दि.१५/०४/२०२५ रोजी निर्गमित केलेले असून त्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग ता.मालेगांव यांनी अपिलार्थी यांना दि.०७/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये रजिस्टर पोस्टाने त्यांच्या कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य पुरविली असल्याचे दिसून येते. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग ता.मालेगांव यांनी दि.०८/०७/२०२५ रोजी आयोगास दिलेल्या खुलाशात असे नमूद केले आहे की, आयोगाकडील दि.१५/०४/२०२५ रोजीचा आदेश झाला त्यावेळी मी आजारी असल्याने काही दिवस रजेवर होतो. तद्नंतर मी बदली होऊन नविन ठिकाणी रुजू झालो त्यामुळे अर्जदार यांना माहिती देण्यास विलंब झालेला आहे. परंतू अर्जदार यांना माहिती न देणेबाबत कुठलीही भूमिका नव्हती. अर्जदार यांना माहिती

घेवून जाणेबाबत मी वेळोवेळी सूचित केले आहे तेव्हा अर्जदार यांनी मी माहिती घेवून जाईल माझी काही एक तक्रार नाही असे वारंवार मला सांगितल्यामुळे मी लेखी स्वरुपात कार्यवाही केली नाही याबद्दल क्षमस्व. माहिती न पुरविणे किंवा आपल्या आदेशाचा अवमान करणे हा माझा हेतू नव्हता तसे माझ्याकडून अनावधनाने घडले असल्याने माझ्या खुलाशाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन माझ्याविरूध्द कारवाई करु नये अशी विनंती केलेली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग ता.मालेगांव यांनी आयोगाने द्वितीय अपिल क्र.१३६३/२०२२/नाशिक संदर्भात दि.१५/०४/२०२५ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दि.०७/०७/२०२५ च्या पत्रान्वये कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती तक्रारदार यांना रजिस्टर पोस्टाने विनामूल्य पुरविली असल्याचे दिसून येते. तसेच बदली होऊन नविन ठिकाणी रुजू झाल्यामुळे तक्रारदार यांना माहिती देण्यास विलंब झाला आहे ही बाब योग्य असल्याचे दिसून येते. सबब, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग ता.मालेगांव, जि.नाशिक (श्री.ए.डब्लु.साने) यांनी दि.२०/०१/२०२६ अन्वये आयोगास सादर केलेला खुलासा समर्थनीय असल्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) नुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग ता.मालेगांव, जि.नाशिक (श्री.अमित विल्सन साने) यांनी आयोगास सादर केलेला खुलासा समाधानकारक असल्यामुळे मान्य करण्यात येवून त्यांच्याविरुध्द प्रस्तावित कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत तक्रार क्र.२५९/२०२५/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

जा.क्र. e८९ , दिनांक :- 03 FEB 2026